# ३१. आपलं वाचनालय

A36JEK

• ऐका. म्हणा. वाचा.



**अतुल** : ए सुहास ! चल ना रे खेळायला.

**सुहास** : थांब ना रे जरा. ह्या पेपरमध्ये किती छान माहिती छापून आली आहे. ह्या माहितीचं कात्रण कापून घेतो. मग जाऊया ना खेळायला.

**अतुल** : तू एवढ्या कात्रणांचं करतोस तरी काय ?

**सुहास** : अरे, वर्तमानपत्रांत छान छान कविता, चित्रकथा, गोष्टी, कोडी, पशुपक्ष्यांची माहिती येते. ती मी कापून वहीत चिकटवतो. मॅडमनं सांगितलेला प्रकल्प पूर्ण होतो.

**अतुल** : अरे वा ! छानच.

**सुहास** : अरे एवढंच नाही. काही वेळा रद्दीमध्ये कवितांची, गोष्टींची चांगली पुस्तकं येतात. ती मी बाजूला काढून ठेवतो.

**अतुल** : त्या पुस्तकांचं तू काय करतोस?

**सुहास** : त्यांचं मी एक वाचनालय तयार केलं आहे. चल माझ्या घरी. मी तुला दाखवतो.
(ते दोघे सुहासच्या घरी येतात. त्याचवेळी मीनाही तिथे येते.)

**सुहास** : ये मीना.



**मीना** : सुहास, ही पुस्तकं तुझ्या वाचनालयासाठी घे. ही सगळी पुस्तकं माझ्या वडिलांनी आणली होती. आम्ही ती पुस्तकं वाचली. ती रद्दीत देण्याऐवजी तुझ्या वाचनालयासाठी मी घेऊन आले.

**अतुल** : हे छान झालं. मी सुद्धा तुला चांगली पुस्तकं देईन.

**सुहास** : मीना, अतुल मी तुमचा आभारी आहे. हे वाचनालय केवळ माझं नाही, तर सगळ्यांसाठी आहे. थेंबे थेंबे तळे साचे, तसं एक-एक पुस्तक गोळा करून हे वाचनालय तयार झालं आहे; म्हणून मी ह्या वाचनालयाचं नाव ठेवलं-'आपलं वाचनालय.'

**अतुल** : छान आहे नाव !

**सुहास** : चला तर ! आता आपण सगळे रविवारी भेटूया. वाचूया. खेळूया. अभ्यासही करूया.

(सारेजण हसतात.)

## प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अतुल सुहासला कशासाठी बोलवत होता?
२. वर्तमानपत्रांत कशाकशाची माहिती येते?
३. सुहास रद्दीतील कोणती पुस्तके बाजूला काढतो?
४. सर्वजण रविवारी भेटून काय काय करणार आहेत?

## प्र. २. सांगा.

१. सुहास कात्रणांचे काय करतो?
२. सुहास रद्दीतील पुस्तकांचे काय करतो?
३. सुहासने वाचनालयाला 'आपलं वाचनालय' हे नाव का दिले ?

• पाहा. वाचा. वाक्ये बनवा.




✻ आई, बाबा, ताई माझे खूप लाड करतात.

✻ आजोबा माझा अभ्यास घेतात.

✻ आमचे फळांचे दुकान आहे.

✻ आई दुकानाच्या कामात बाबांना मदत करते.

✻ बाबा आईला स्वयंपाकात मदत करतात.

✻ आजी छान छान गोष्टी सांगते.

✻ सणाच्या दिवशी काकाकाकी येतात.



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

अमराठी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी सुलभभारती इ. ४ थी

₹ २४.००